# मुख्य प्रेषितांची बेंगळूरु भेट – सप्टेंबर २०२५

## "चांगले करण्याची हीच वेळ आहे."

आपण मोठ्या आशेने त्या क्षणांसाठी तयारी करत आहोत जेव्हा आपले प्रिय मुख्य प्रेषित यांच्या रविवार, २१ सप्टेंबर २०२५ रोजीच्या भेटीने आपल्या आत्म्याला नवसंजीवनी मिळणार आहे. मुख्य प्रेषित जॉन-लुक श्नायडर यांची ही ऐतिहासिक भेट, बंगळूरु, कर्नाटक या ठिकाणाला दिलेली त्यांची पहिली भेट ठरणार आहे.

आम्ही न्यू अपोस्टोलिक चर्चमधील प्रत्येक प्रिय सभासदाला विश्वास, सहभागिता आणि आनंदमय ऐक्यात एकत्र येण्याचे आमंत्रण देत आहोत.

## मुख्य प्रेषितांची डिव्हाइन सर्व्हिस

- **दिनांक** : रविवार, २१ सप्टेंबर २०२५
- **वेळ** : सकाळी ११: ०० वाजता
- **स्थळ** : *ज्योती निवास ऑडिटोरियम, कोरामंगला इंड्स्ट्रीएल लेआऊट, कोरामंगला, बंगळूरु, कर्नाटक ५६००३४*

## रेजीट्रेशनविषयीची माहिती

रेजीट्रेशन आता सुरू झाले आहे. आपण प्रति व्यक्ती ₹ ५०० (किंवा त्यापेक्षा अधिक) देणगी देऊन ओडिटोरियममध्ये आपली जागा आरक्षित करू शकता. जे उदारपणे अधिकचे कॉन्ट्रीब्युशन देऊ इच्छितात त्यांचे या कार्यास पाठबळ देण्यासाठी हार्दिक स्वागत आहे.

बसण्यासाठीची आसन व्यवस्था मर्यादित आहे, त्यामुळे आपली जागा निश्चित करण्यासाठी लवकर नोंदणी करा! आपल्याला मदतीची आवश्यकता असल्यास, कृपया आपले डिस्ट्रिक्ट रेक्टर किंवा प्रेषित यांच्याशी संपर्क साधा.

पवित्र प्रभुभोजनाचे वाटप करणारे सेवक, सहाय्यक आणि आसन व्यवस्था पाहणारे स्वयंसेवक यांना विनंती आहे की त्यांनी आरक्षणासंबंधीच्या सूचनांसाठी प्रेषित यांच्याशी थेट संपर्क साधावा. कृपया नोंद घ्यावी की दुसऱ्यांदा नोंदणी केल्यास शुल्क परत केले जाणार नाही. नोंदणी शुल्क आगाऊ दिलेले दानार्पण आहे आणि ते परत केले जाणार नाही. आपल्या उदार समर्थनाबद्दल धन्यवाद.

या लिंकचा वापर करून तुम्ही तुमचे स्थान आरक्षित करू शकता – https://www.townscript.com/e/ka01ca2025-gf

# मुख्य प्रेषितांची बेंगळूरु भेट – सप्टेंबर २०२५

## डिव्हाइन सर्व्हिसनंतरची सहभागिता आणि सामुदायिक भोजन

डिव्हाइन सर्व्हिसनंतर, तुम्हा सर्वांना दुपारच्या स्वादिष्ट भोजनासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. तुमच्यासाठी हा एक सुकर आणि सुसंघटीत असा अनुभव ठरेल याची निश्चिती करण्यासाठी स्वयंसेवकांच्या सूचनांचे पालन करा अशी आम्ही तुम्हाला नम्र विनंती करत आहोत.

तुमच्या परतीच्या प्रवासाची वेळ आधीच कळविल्यास आयोजकांना त्या क्रमाने तुम्हाला जेवन पुरवण्यास मदत होईल. आपल्या वेळेची वाट पाहत असताना, त्या वेळेचा सदुपयोग आपले अनुभव इतरांसह वाटून घेण्यासाठी, इतरांशी संबंध वाढवण्यासाठी आणि कायमस्वरूपीच्या आठवणी निर्माण करण्यासाठी उपयोगात आणा.

## प्रवास आणि राहण्याच्या व्यवस्थेविषयी

बाहेर गावातून सर्व्हिसला उपस्थित राहणाऱ्यांसाठी आरामदायक आणि सोईस्कर अशा विशेष व्यवस्था करण्यात आल्या आहेत. कार्यक्रमासाठी येणाऱ्या सभासदांसाठी परवडणाऱ्या दरात निवासाची आणि शहरार्तगत वाहतूकीची व्यवस्था कमीत कमी अतिरिक्त खर्चात, ना-नफा या तत्वावर उपलब्ध आहे.

आरक्षण, प्रवास किंवा निवास व्यवस्था या संदर्भातील मदतीसाठी, कृपया तुमच्या विभागातील प्रमुख किंवा प्रेषित यांच्याशी संपर्क साधा.

## सप्टेंबर २०२५ – आपल्या मुख्य प्रेषितांच्या माध्यमातून आध्यात्मिक नवसंजीवनी

उलटी गिनती सुरू झाली आहे!

चला आपण एकत्र येऊन आणि फुट पाडणाऱ्या शक्तीं विरुद्ध लढण्याच्या शपथेचा पुनरुच्चार करून सुवार्तेची शुद्धता राखण्यासाठी आपल्या प्रिय मुख्य प्रेषितांचे हृदय आणि हात बळकट करूया.

ही माहिती इतरांपर्यंत पोहोचवा. आपल्या प्रियजनांना आमंत्रित करा. आपली जागा आरक्षित करा आणि ह्याला एकजुटीचा आणि ध्येयाचा सोहळा बनवा की ज्यात कधीही न मिटणारे असे आवाहन देखील समाविष्ट आहे की **"चांगले करा."**

#EeSalaBengaluru | #ThisTimeBengaluru | #ItIsTimeToDoGood